# प्रेस नोट

**दिनांक ३१/०५/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## पो.स्टे. खापरखेडा हद्दीतील मौजा बाबुळखेळा येथील फार्म हाऊस मध्ये करोडो रुपये असल्याच्या खबरेवरून घातलेला दरोडा अवघ्या २४ तासात उघड स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

दिनांक 30/05/2022 चे 06.34 वा. फिर्यादी नामे— सौ शुभांगी अनिल मोहबे वय ५१ वर्ष, रा. प्लाट नं ३२, बुटी ले—आउट राजनगर, नागपुर यांनी पो.स्टे. खापरखेडा येथे येउन रिपोर्ट दिली की, बाबुलखेडा शेतशिवारातील कॅनल जवळील फिर्यादीचे शेतातील घर येथे दिनांक २९/०५/२०२२ चे २२.३० वा. ते २३.३० वा. सुमारास त्यांचे शेतातील घरामध्ये शेतकामासाठी ठेवलेल्या शेतगडयास तोंडाला रूमाल बांधलेले ८ अज्ञात आरोपीतांनी घरात शिरून चाकुचा धाक दाखवुन हाणमार करून तसेच हात बांधुन तळ घर कोठे आहे? असे विचारून घरातील साहीत्याची फेकफाक करून घराचे हॉलमधिल टाईल्स खणुन तसेच घरामध्ये लागलेल्या कॅमेऱ्याची तोडफोड करून नुकसान केले. तसेच घरामध्ये असणारा ०१ वायफाय कॅमेरा किंमती ४,८००/—रू. व १ टॉर्च किंमती ३००/—रू. असा एकुण ५,१००/—चे साहीत्य चोरून नेले आहे. त्यावरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीतांविरूद्ध अप क्र. ३०४/२०२२ कलम ३९५, ३२३, ४२७, ४५२ भादवी कायद्यान्वे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने संमातर तपासाचे दिलेले आदेशान्वये दिनांक ३०/०५/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक पो.स्टे. खापरखेडा हद्दीत कामठी विभागातील पोलीस स्टेशन खापरखेडा अप क्र. ३०४/२०२२ कलम ३९५, ३२३, ४२७, ४५२ भादवी च्या गुन्ह्याती समांतर तपास करीत आरोपीचा शोध घेत असतांना बातमीदार कडून मिळालेली गोपनीय माहिती नुसार, आरोपी क्र. १) आकाश हरीचंद्र तांडेकर वय २४ वर्ष, रा. सालई ता. पारशिवणी याचा सदर गुन्ह्यात समावेश आहे. अशा मिळालेल्या माहितीनुसार जावून संशयित इसम आकाश तांडेकर यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्हयाची कबुली देऊन गुन्हा करतांना पुन्हा सोबत १० आरोपी असल्याचे सांगून त्यांना सोबत घेऊन दिनांक २४/०५/२०२२ रोजी बाबूलवाडा फॉम् हाऊस वर जाऊन रेकी करून दिनांक २९/०५/२०२२ चे रात्री सदर ठिकाणी जाऊन दरोडा घातला. तेथील सामानाची तोडफोड करून तिथे लावलेले cctv कॅमेरा, वायफाय कॅमेरा व टॉर्च जबरीने चोरून नेल्याचे सांगितले करिता त्याचे सोबत असलेले ६ साथीदार आरोपी क्र. २) बॉबी लहानु पाथरे वय २५ वर्ष, रा. कन्हान, ३) शामु रामू पाथरे वय २६ वर्ष, रा. कन्हान, ४) अखिलेश मुनेश्वर सोमकुवर वय २४ वर्ष, रा. कन्हान, ५) राष्ट्रपाल मधुकर मेश्राम उर्फ मंत्री, वय २९ वर्ष, रा. पिपला डाक बंगला चे खापरखेडा, ६) सुनील मनीष धुर्वे वय २४ वर्ष, रा. पिपला डाग बंगला चे खापरखेडा व ७) अजय मुरलीधर शेबे वय २३ वर्ष, रा. वडोदा यांना ताब्यात घेऊन पुढील तपास कमी पो,स्टे खापरखेडा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

गुन्ह्याचा उद्देश :— सदर फार्म हाऊस मध्ये मोठ्या प्रमाणात करोडो रुपये आहेत अशा माहिती वरून मोठी रक्कम मिळेल अशी माहिती नागपूर येथील मुख्य सुत्रधार अजय पाटील यांनी त्याचा भाचा बॉबी पाथरे रा. कन्हान यास माहिती पुरवली त्यानंतर त्यांनी त्याचे गावचे अखिलेश सोमकुवर व श्याम पाथरे यांना वडोदा येथील अजय

शेभे यांना जोडले. अजय शेबे यांनी इतर आरोपींना जोडले व दरोड्यच्या कटात सामील केले. त्यानुसार दि. २४.०५.२०२२ रोजी लेडीज च्या वेशात फॉर्म हाऊस वर जाऊन रेकी केली व दिनांक २९.०५.२०२२ रोजी घटना करण्याकरिता सदर ठिकाणी जाऊन दरोडा घातला तिथे चौकीदार मिळाला. त्याचे हात बांधून त्यास मारपीट केली व कॅमेराची तोडफोड करून एक वायफाय कॅमेरा घेऊन गेले. तडघर शोधण्याचा प्रयत्न केला त्या ठिकाणी खुदाई सुद्धा केली परंतु फिर्यादी यांनी लागलीच पो. स्टे खापरखेडा यांना सदर दरोड्यची माहिती दिली असता लागलीच स्टाफ घटना स्थळी दाखल झाल्याने आरोपी पळून गेले. पाहिजे आरोपी १) अजय पाटील रा.नागपूर, २) शुभम कोकाटे रा.मौदा, ३) फारुख रा. कोरडी व ४) सुरेश चौधरी कोराडी.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर व. मा. अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकनिकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, स्थानिक गुन्हे शाखा ना ग्रा यांचे नेतृत्वात सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, पोहवा नाना राऊत, पोहवा अरविंद भगत, पोहवा राजेंद्र रेवतकर, नापोशी आशिष मुंगळे, नापोशी किशोर वानखेडे, नापोशी उमेश फुलबेल, नापोशी शैलेश यादव, नापोशी वीरेंद्र नरड, नापोशी प्रणय बनाफर व चासफो साहेबराव बहाडे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर